रजि. No. JAL/408/2017-2019 आर.एन.आय. नं. नवी दिल्ली 49878/83 स्थापना :- २६ जानेवारी १९८३

शासनमान्य साप्ताहिक

प्रतिशाली

प्रती, मा. आदरणीय- श्री अनिलजी जोशी साहेब मिडिया प्रमुख जैन [illegible] जळगांव

वार्षिक वर्गणी १०० रू.

मुद्रक :- श्री. अरुण रंगराव मोरे
विशाल प्रिंटींग प्रेस ८१ भास्कर मार्केट, जळगांव
-: प्रकाशन स्थळ :-
कौसल्या निवास १०/२ गणेश नगर जळगांव
मोबा. 9922774847, 9922774825
e-mail Saptaik Pratishali @gmil.Com.

संस्थापक संपादक (जेष्ठ पत्रकार)
श्री. अरुण रंगराव मोरे
Mo. 9922774847

मुख्य संपादक
श्री. प्रशांत अरुण मोरे
Mo. 9890301094

कार्यकारी संपादक
श्री. विशाल अरुण मोरे
Mo. 9766028847

वर्ष – ३७ अंक – ९ सोमवार २५/२/२०१९ (डाक २६/२/२०१९) किंमत २ रुपये पाने ६

स्मरण जलदूताच्या जलसंवादाचे...

जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांचा आज तृतीय श्रद्धावंदनदिन. एका थेंबानं त्यांच्याशी केलेला हा जलसंवाद...

स्मरण एका थेंबाकडून

प्रिय भाऊ,

मी पाण्याचा एक थेंब तुमचे स्मरण करतोय तुमच्या तिसऱ्या स्मृतिदिनानिमित्त...

तीन वर्षापूर्वी तुम्ही जगाचा निरोप घेतला. तुमचे स्मरण करण्याचे केवळ एवढेच निमित्त नाही. स्मरण करण्याची असंख्य कारणं आहेत. आमच्या, म्हणजेच पाण्याच्या अस्तित्वासोबतच तुम्ही स्वतःला जोडून घेतले. बहुधा ईश्वरानेच तुम्हाला जलदूत म्हणून पृथ्वीवर धाडले असावे! ज्या देशात महापूर आणि दाहक दुष्काळही येतात, अशा देशात तुम्ही प्रत्येक थेंबाची किंमत जाणली. तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ते मूल्य अधिक वाढवले. *'थेंब थेंब पाणी, जीवनात चैतन्य आणी'* ह्या मूलमंत्राने तुमचे जीवन व्यापून गेले. आम्हा थेंबांना तुम्ही मौल्यवान बनविले. *'मोअर क्रॉप, पर ड्रॉप'* अशी शिकवण तुम्ही इथल्या शेतकऱ्यांना दिली; त्यांनीही ती स्वीकारली. मग फुलले समृद्धीचे मळे!

तुम्ही आयुष्यभर संवादावर सतत भर दिला. व्यवसाय... कुटुंब... शेतकरी... समाजकारण... नवी पिढी... अशा तुमचे आयुष्य व्यापून टाकणाऱ्या सगळ्या क्षेत्रांत तुम्ही मुक्त संवाद करीत राहिलात. संवादाचे महत्त्व सगळ्यांना पटवून दिले. संवादामुळेच जगभरातील बहुसंख्य देशांत तुम्ही अनेक उद्योगांना संजीवनी दिली. तिथल्याही शेतकऱ्यांच्या शेतात हास्य पिकवले. *'पाणी निम्म्याने, उत्पादन दुपटीने, करामत करा जैन ठिबकने!'* हे समस्त शेतकऱ्यांनी जाणले. म्हणूनच आज जैन इरिगेशनचा झेंडा जगभरातल्या कोट्यवधी शेतांमध्ये डौलाने फडकत असतो.

संवाद केवळ तुम्ही माणसांपुरता मर्यादित ठेवला नाही. झाडा-झुडूपांशी, पिकांशी, फळा-फुलांशी, पशू-पक्ष्यांशी संवाद साधला तर आर्थिक सुबत्ता फार दूर नाही, असं तुम्ही सतत अधोरेखित करत होतात. नंतर तर तुम्ही पाण्याशी बोलू लागलात. अगदी माझ्यासारख्या हरेक छोट्या थेंबाशीही! तो होता जलसंवाद!! थेंबाबरोबर जलसंवाद म्हणजे त्या थेंबाला काटेकोरपणे काम करायला लावणे. भाऊ, किती सहज आणि सोप्या रीतीनं तुम्ही इथल्या शेतकऱ्याला तंत्रज्ञानाकडे वळविले! मुबलकता असली की आमचा वापर कसाही होऊन त्याची नासाडी ठरलेलीच असायची. गरज नसताना आम्हाला शेतांतून मोकाट हिंडण्याची खोड लागली. ही खोड तुम्ही मोडली! अर्थात, आमचे काही बांधव नाइलाजाने ही खोड सोडू शकलेले नाहीत. आम्ही मुक्त वहायला लागलो की तुम्ही तुम्ही म्हणत,

"अरे यांना अडवा, जिरवा, मुरू द्या. थेंबाथेंबाने त्याला पिकांच्या मुळाशी गरजेपुरते जाऊ द्या! त्यांच्यावर नियंत्रण ठेवा म्हणजे प्रत्येक थेंब शिस्तीत त्याचे काम करेल. त्याच्यावर लक्ष ठेवा. प्रत्येक थेंबाशी बोला. म्हणजे तोही पिकाशी बोलू लागेल. संवाद सुरू झाला की त्याचं काम परिणामकारकपणे करता येईल. पिकाचे म्हणजेच प्रत्येक झाडाचे अन् थेंबाचे मैत्र वाढले तर तुमची संपत्ती आपोआप वाढेल!

भाऊ, तुमचा जलसंवादाचा हा मंत्र फक्त शेतकऱ्यांसाठी नव्हता. तुम्ही एकाचवेळी परंपरा, मूल्य, तंत्रज्ञान आणि उद्याचे भान याभोवती स्वतःला बांधून घेतले होते. संवादाचे बोट मात्र सोडलेले नव्हते. रानावनात सुरू झालेल्या या संवाद-जलसंवादाची व्याप्ती तुम्ही शास्त्रज्ञांसोबत वेगळ्या पातळीवर नेली. *'माझा शेतकरी पहिल्यांदा, त्याची गरज पहिल्यांदा. त्याला झेपेल, परवडेल आणि आवडेल अशा चौकटीत तुम्ही तंत्रज्ञान आणा'*, असे आग्रहाने त्यांना सांगत असत. मग थेंबांसोबत खतं देण्याचे तंत्रज्ञान अवतरले. शास्त्रीय मापेतले फर्टिगेशन का काय ते! मग भाऊ तुमचे काम सुरू व्हायचे... तंत्रज्ञान आणि शेतकऱ्यांना जोडण्याच्या संवादाचे. जणू एका जलयोगी पुरूषाच्या जलसंवादाचे! तुमचा आग्रह असायचा, *'प्रत्येक थेंबाला पुरेपूर काम द्या. या थेंबांना खते वाहून नेण्याचेही काम द्या'* तुमच्या या संवाद शैलीमुळे शेतकरी तंत्रज्ञान स्वीकारायला लागले. पिकाच्या मुळापर्यंत जाण्याची आमची 'वाहतूक व्यवस्था' सुरू झाली. खतांची नासाडी थांबली. खतं हवेत उडून जाणे कमी झालं. पानांमध्येच अडकून पडणे थांबलं. अंतिम परिणाम काय..? खर्चात बचत! संवादामुळे तंत्रज्ञान तुम्ही शेतात रुजवलं. असंख्य शेतकऱ्यांनी तुम्हाला हृदयात स्थान दिलं!

भाऊ, आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रत्येक थेंबाची तुम्ही काळजी घेत राहिलात. काळजीमागे शेतकऱ्याचे हित, हाच तुमचा ध्यास होता. आमच्यासारख्या थेंबालाही तुम्ही प्रतिष्ठा दिली... मूल्य दिले... किंमत वाढवली. ज्याला जमेल ते काम स्पष्ट सूचनेसह देणं व परिणामकारकपणे ते करायला लावणे, ह्या तुमच्या स्वभावानुसार आम्हालाही काम दिले. आणि स्पष्टपणे बजावले की तुमचे काम, *'मोअर क्रॉप, पर ड्रॉप'* हेच आहे. स्रोतापासून पिकांच्या मुळापर्यंत पोहोचताना तुमचा हाच मंत्र परिणामकारक पद्धतीने जपणे, हीच तुम्हाला खरी आदरांजली. तुमच्या जलसंवादाचे अस्तित्व तुम्ही अजरामर करून ठेवले आहे. आम्हा थेंबाथेंबांचे अस्तित्व हेच आमचे आणि तुमचेही अस्तित्व आहे. ते कोण विसरणार?

कळावे,
एक थेंब



> पाणी हे जीवनाचे मूळ आहे, आधार आहे.
> जीवनाला विशिष्ट आकार देण्यासाठी सर्वोच्च साधनही आहे.
> नव्हे; पाणी म्हणजे मनुष्यजातीची जननी आहे.
> – भवरलाल जैन

भवरलालजींनी दिला ग्रामस्वावलंबनाचा मंत्र

जगाच्या सर्वांगीण विकासाचा आधार कृषिक्षेत्र असून, सर्वाधिक रोजगार शेतीतून निर्माण होतो. शेतीतून ग्रामीण भागात शेतीपूरक जोडधंद्यांची निर्मिती होऊन खेडी स्वावलंबनाच्या बळावर उभी राहू शकतात, हा विश्वास उराशी बाळगून जैन उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांनी नवनिर्मितीचे कार्य केले. २५ फेब्रुवारी हा भवरलालजी जैन यांचा स्मृतिदिवस, त्यानिमित्त गावांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्यावर टाकलेला दृष्टिक्षेप

खरा भारत पाहायचा असेल तर खेड्याकडे जायला हवे. खेडी समृद्ध झाली तर देश समृद्ध होईल यावर महात्मा गांधीजींचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी ग्रामीण भागातील विचार-आचार-संस्कारानुसार संपूर्ण जीवन व्यतित केले. गांधीजींच्या कृषी व ग्रामीण विकासाचा संस्कार डॉ. भवरलालजी जैन यांनी पाळला. पुढच्या पिढीलाही ग्रामविकासाच्या विचारांचा संस्कार दिला. यामुळेच जैन इरिगेशनचे प्रत्येक उत्पादन, संशोधन हे ग्रामीण विकासाचा कणा असलेल्या शेतकऱ्याला धरूनच. कृषी संस्कृतीबाबत भवरलालजी म्हणायचे, रर्श्री१४७कृषी संस्कृतीत आनंद आहे. सृजन आहे. संवर्धन आहे. आई आणि भूमी यांच्यातील नवनिर्मितीचे तत्त्व वंदनीय आहे. आईला स्वतःच्या लेकरांकडे पाहताना आपण पाहा किंवा हिरव्यागार पिकाला वाऱ्यावर डोलताना धरणीमातेला होणारा आनंद संवेदनेने जाणून घ्या, असे पाहण्यात, जाणून घेण्यातच माणसाचे माणूसपण आहे. रर्श्री१४८ यावरून कृषिसंस्कृती कृतिशीलपणे आचरणात आणणाऱ्या भाऊंची शेती, मातीशी असणारी निष्ठा सर्वांनाच प्रेरणादायी ठरते.

ग्रामीण विकासाची बांधिलकी

ग्रामीण अर्थव्यवस्थेत भवरलालजींचे योगदान शेती व खेड्यांच्या अर्थशास्त्रीय पक्क्या विचारांची बांधिलकी ठेवूनच असून, तोच वसा त्यांची पुढची पिढी जोपासत आहे. शेती विकासाबरोबरच भवरलालजींनी ग्रामीण विकासाची कामे हाती घेतली. त्यांनी प्रामुख्याने जलसंवर्धनावर भर दिला. शेतीमध्ये ठिबक, तुषार सिंचनाचा वापर कसा वाढेल यावर भर दिला. यासोबतच पाणी निर्माण व झाडं, फळझाडं, पर्यावरण निर्मितीचे, संवर्धनाचे कार्य केले. शेतकऱ्यांना जैन हिल्स येथे आणून त्यांच्यासाठी नवतंत्रज्ञानाची माहिती करून देणारी यंत्रणा उभी केली. त्यामुळे जैन हिल्स येथे आज देशभरातील शेतकरी येत असतात. शेतीविषयक नव्या गोष्टी जाणून घेत असतात. जैन हिल्समधून गेलेला शेतकरी आपल्या गावी शेतीतील नवे प्रयोग निश्चितपणे करतो. आज देशभरात लाखो शेतकरी असे आहेत, जे आपापल्या गावी जाऊन नवे प्रयोग करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाचा चेहरा बदलण्यास सुरुवात झाली आहे. ग्रामीण कृषिक्षेत्रामध्ये क्रांती येऊ लागली आहे. भवरलालजींनी प्रामुख्याने पाणी व्यवस्थापन, फळबाग तंत्र, कमी जागेत अधिक उत्पन्न घेण्याचे तंत्रज्ञान विकसित केले. त्यामुळे ग्रामीण विकासाला एकप्रकारे चालना मिळाली आहे. असंख्य शेतकऱ्यांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल झालेले आहेत.

शेतकरी अर्थव्यवस्थेचा कणा

राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राने मोठा वाटा उचललेला आहे. कृषी क्षेत्रावर जवळपास ७० टक्के लोकसंख्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अवलंबून आहे. भारतातील प्रमुख उद्योगाला कच्च्या मालाचा पुरवठा हा कृषिक्षेत्राकडूनच होत असतो. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विचार केला तर अधिकांश भाग हा कृषी व्यापाराशी निगडित आहे. थोडक्यात देशातील जनतेला अन्नधान्याचा पुरवठा करणारे क्षेत्र म्हणून कृषिक्षेत्राचा विचार केला जातो. म्हणूनच भवरलालजी म्हणतात, 'देशातील शेतीची उत्पादकता आपण पूर्णपणे विकसित करू शकलो तर जगाच्या अन्नधान्याची गरज आपण निम्म्याने पूर्ण करू शकू.' शेतकरी हा केवळ देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा नव्हे, तर देशाच्या संस्कृतीचा मजबूत पायासुद्धा आहे. आणि या संस्कृतीला पाठबळ द्यावयाचे असेल तर खेड्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. त्यादृष्टीने पावले उचलली पाहिजे. यातून बलशाली भारताचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. ग्रामीण विकासात कृषिसंस्कृतीचे योगदान, गावात राहणाऱ्या प्रत्येकाची जबाबदारी, महिलांची राजकीय आणि सामाजिक स्थिती यासह अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर प्रेरणादायी मार्गदर्शन भवरलालजी जैन यांच्या 'एक न संपणारा प्रवास, ग्रामीण विकास' या पुस्तकातून मिळते. महात्मा गांधीजींच्या संस्कारांचे कोंदण लाभलेल्या भाऊंनी गांधी रिसर्च फाउंडेशनच्या माध्यमातून 'गांधी तीर्थ' ही जागतिक दर्जाची वास्तू साकारली. जैन इरिगेशन आणि गांधी रिसर्च फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने 'बा-बापू १५०' जयंती अंतर्गत दीडशे खेडी स्वयंपूर्ण विकसित करण्याचा संकल्प केला आहे. या खेड्यांमध्ये लोकसहभागातून विविध समाजोपयोगी कामे, जलसंधारण, शेतीपूरक लघू व गृहोद्योगांबाबत चर्चासत्रे, प्रशिक्षण घेतले जात आहेत. याचे भविष्यात सकारात्मक परिणाम होऊन शेतीपूरक उद्योगांची वृद्धी होण्यास वाव आहे. यामुळे शेतीतून ग्रामविकासाचे स्वावलंबन होऊन 'श्रीमंतांचा गरीब देश' ही ओळख पुसली जाऊ शकते. यासाठी कृषिक्षेत्रात अत्याधुनिक तंत्रज्ञानासोबतच, कृषिपूरक धोरणे असावीत त्याहूनही अधिक भवरलालजी जैन यांच्यासारखे शेतीविषयी सकारात्मक विचार असलेल्या अन्य मार्गदर्शकांनी पुढे येण्याची गरज आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना उन्नतीचा मार्ग गवसेल. हे कार्य जैन इरिगेशन चोखपणे करत असल्याचा जळगावकरांना अभिमान आहे. कृषी विकासातून ग्रामस्वावलंबनात माझा सहभाग कसा असेल, यावर विचार करण्याची गरज आहे. यातून उद्याचा बलशाही भारत पाहता येईल. जागतिक महासत्ता असलेल्या देशांच्या पंगतीत भारताला न्यायचे असेल तर कृषिविकासाशिवाय पर्याय नाही.

– दिनेश दीक्षित,
मीडिया विभाग, जैन इरिगेशन

पान ३ वरुन.....

भारतीय एक असून देशाच्या स्वातंत्र्यासाठी क्रांतिकारकांनी केलेले बलिदान देशासाठी प्रेरणदायी आहे. समाजातील वंचित घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी प्रयत्न होत असून शासनासोबत सामाजिक संस्थानी कर्तव्यभावनेने पुढे आले पाहिजे. क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतिकेंद्र विकासासाठी प्रेरक ठरेल असा विश्वास व्यक्त करून केंद्रासाठी तयार केलेल्या आरखाड्यास मंजुरी दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांना धन्यवाद दिले.

यावेळे श्री.नारायणस्वामी यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाला खा.ए.टी.पाटील, आमदार स्मिता वाघ, चंदूलाल पटेल, शिरीष चौधरी, सुरेश भोळे, उन्मेष पाटील, रा.स्व.संघाचे शरद ढोले, राजेश पाटील, चैत्राम पवार आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते क्रांतिकारी खाज्याजी नाईक स्मृतिकेंद्राचे भूमिपूजन करणयात आले. मुख्यमंत्र्यांनी खाज्याजी नाईक समधीस्थळाचे दर्शन घेतले. तत्पूर्वी श्री.फडणवीस यांचे हेलिपॅडवर आगमन झाले. सहकार राज्यमंत्री गुलाबराव पाटील, आमदार श्रीमती वाघ, अपर जिल्हाधिकारी गोरक्षनाथ गाडीलकर यांनी त्यांचे स्वागत केले.

।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।

कष्टातुनी वसंत
बहरला
आमचा आधारस्तंभ
हरपला
नाही उरली साथ
आम्हाला
आठवण येते
क्षणाक्षणाला...

पद्मश्री डॉ. भवरलालजी हिरालालजी जैन
(दि. १२/१२/१९३७-२५/०२/२०१६)

श्रध्दानवत
अरुण मोरे
मुख्य संपादक,
साप्ता. प्रतिशाली, जळगांव

साप्ताहिक प्रतिशाली हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. अरुण रंगराव मोरे यांनी विशाल प्रिंटीग प्रेस कौसल्या निवास, १०/२ गणेश नगर, आकाशवाणी केंद्रामागे, जळगांव व ८१ भास्कर मार्केट, एम. जे. कॉलेजरोड, जळगांव येथे छापून तेथेच प्रकाशित केले.